मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# भाजपा उमेदवारांची पहिली यादी रविवारी

## निष्ठावंतांवर अन्याय होणार नाही; आमदार शंकर जगताप यांची माहिती

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकांसाठी भाजपच्या उमेदवारांची अंतिम यादी प्रदेश कार्यालयाकडे सादर करण्यात आली आहे. पक्षश्रेष्ठींनी विधानसभानिहाय उमेदवारांचा आढावा घेतला असून, उमेदवारांची पहिली यादी रविवारी (दि. २८) प्रसिद्ध करण्यात येईल अशी माहिती पिंपरी चिंचवड निवडणूक प्रचार प्रमुख आमदार शंकर जगताप यांनी शुक्रवारी (दि. २६ ) हि माहिती दिली.



आमदार शंकर जगताप यावेळी म्हणाले, दोन दिवसात उमेदवार यादी जाहीर करण्यात येणार आहे. पालिका निवडणुकीसाठी भाजपच्या उमेदवारांची अंतिम यादी आम्ही प्रदेश कार्यालयाकडे पाठविली आहे . मुंबईत या संदर्भात बैठक झाली. बैठकीला सर्व कोअर कमिटीचे सदस्य उपस्थित होते. उमेदवारांचा विधानसभा निहाय आढावा या बैठकीमध्ये घेण्यात आलेला आहे. ज्या प्रभागांमध्ये उमेदवारी निश्चित आहे त्या नावांना अंतिम मान्यता देण्यात आली असली तरीही अंतिम निर्णय हा पक्षश्रेष्ठींचाच असणार आहे. त्यानुसार प्रदेश आणि कोअर कमिटी याबाबत निर्णय घेईल.

भारतीय जनता पक्ष हा विकासाचे व्हिजन पुढे ठेवून काम करणारा पक्ष आहे. त्यामुळे विरोधक कितीही एकत्र आले तरीही त्याचा आमच्या पक्षावर परिणाम होणार नाही . आमच्या उमेदवारांचा विजय हा निश्चित आहे. भारतीय जनता पक्षामध्ये सर्व निष्ठावंत कार्यकर्त्यांना वेळोवेळी न्याय देण्यात येतो हा इतिहास आहे. कुठल्याही परिस्थितीत निष्ठावंत कार्यकर्त्यावर पक्षाकडून अन्याय होत नाही त्यामुळे आमच्या उमेदवार यादी जाहीर झाल्यानंतरही कोणत्याही प्रभागात नाराजी दिसून येणार नाही. भारतीय जनता पक्ष हा जगातील सर्वात जास्त सदस्य संख्या असलेला पक्ष आहे. त्यामुळे भारतीय जनता पक्षामध्ये येऊन विकासाचे व्हिजन घेऊन कोणी काम करण्यासाठी इच्छुक असेल तर पक्षाकडून त्याचे स्वागतच केले जाते असे देखील आमदार शंकर जगताप यावेळी म्हणाले. कार्यकर्त्यांना माझा नेहमीच पाठिंबा असतो. कार्यकर्त्यांच्या बळावरच कोणतीही लढाई जिंकली जाते. उमेदवारी यादी जाहीर झाल्यानंतरही निष्ठावंतांवर कुठल्याही प्रकारचा अन्याय झाला असे दिसणार नाही. सर्वेक्षणानुसार विजयाची क्षमता असणारे उमेदवार निवडण्यात येणार आहेत ही भाजपची रणनीती आहे. त्यानुसारच पक्षश्रेष्ठींकडून उमेदवार यादी अंतिम करण्यात येत आहे.

### थम्पिंग मेजॉरिटीने भाजप विजयी होईल

» प्रथम राष्ट्र, नंतर पक्ष आणि मग आपण या सूत्रावर भारतीय जनता पक्षाचे काम आधारित आहे. हा विचार घेऊनच या पक्षामधील प्रत्येक कार्यकर्ता काम करत आहे. पक्षाचा आदेश हेच अंतिम ध्येय असते. त्यामुळे नाराजी किंवा विरोध असे कोणीही कार्यकर्ता करत नाही. तिकीट मिळेपर्यंत नाराजी असते. मात्र एकदा पक्षाचा आदेश आला की आपण कामाला लागायचे असते.भाजपमध्ये सध्या इलेक्टिव्ह मेरिट असणाऱ्या उमेदवारांची संख्या जास्त प्रमाणात आहे. त्यामुळे पिंपरी चिंचवडमध्ये "थम्पिंग मेजॉरिटी"ने भाजप विजयी होणार आहे असा विश्वास आहे.

"उमेदवार यादी जाहीर झाल्यानंतर भाजपच्या निष्ठावंत कार्यकर्त्यावर अन्याय होणार नाही याची काळजी पक्षश्रेष्ठी घेणार आहेत. कार्यकर्त्यांच्या बळावरच पक्ष मोठा होत असतो. त्यामुळे निष्ठावंत कार्यकर्त्याला पक्ष न्याय देईलच असा मला विश्वास आहे. उमेदवारांची पहिली यादी रविवारी (दि. २८) प्रसिद्ध करण्यात येईल. पक्षाचा आदेश आल्यानंतर सर्वजण एक दिलाने, एक विचाराने काम करणार असून, पिंपरी चिंचवड महापालिकेत कमळ फुलविल्याशिवाय राहणार नाहीत.

**- शंकर जगताप, निवडणूक प्रचार प्रमुख, आमदार, पिंपरी चिंचवड शहर.**

---

# पिंपरी-चिंचवड महापालिका सार्वत्रिक निवडणूक 2025-26 च्या अनुषंगाने आज एकूण 12 नामानिर्देशन पत्रे दाखल

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी चिंचवड महापालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या अनुषंगाने आज एकूण १२ उमेदवारांनी नामनिर्देशन पत्रे दाखल केली आहेत. त्यानुसार २३ डिसेंबर २०२५ ते आजपर्यंत एकूण १३ उमेदवारांनी नामनिर्देशन पत्रे दाखल केली आहेत.

आज प्रभागनिहाय नामनिर्देशन पत्रे जमा करणाऱ्या व्यक्तींची नावे व त्यांनी नोंदविलेल्या माहितीचा




तपशील

**ग क्षेत्रीय कार्यालय – एकूण ३ अर्ज**

प्रभाग क्र. २४ – विश्वजीत श्रीरंग बारणे (शिवसेना - शिंदे गट) – २ अर्ज

प्रभाग क्र. २१ - अब्दुल शहाबुद्दीन शेख (अपक्ष)

**ब क्षेत्रीय कार्यालय – एकूण ७ अर्ज**

प्रभाग क्र. १७ – दिलीप मुरलीधर गोसावी (भारतीय जनता पार्टी)

राजेंद्र गुलाबराव साळुंके (नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी-२, अपक्ष-२) – ४ अर्ज

राहुल राजेंद्र पालांडे (शिवसेना – उबाठा गट)

सचिन अरूण सिद्धे (अपक्ष)

**इ क्षेत्रीय कार्यालय – एकूण २ अर्ज**

प्रभाग क्र. ४ – उदय दत्तात्रय गायकवाड (भारतीय जनता पार्टी)

प्रभाग क्र. ३ – ज्ञानेश्वर सुरेश बोराटे (अपक्ष)

# चिंचवडमध्ये 'कला-ताला'तून मतदान जनजागृती

## पिंपरी-चिंचवड महापालिकेचा स्वीप अंतर्गत एल्प्रो मॉलमध्ये मतदान जनजागृती उपक्रम

**पिंपरी | प्रतिनिधी**

लोकशाहीच्या उत्सवाला साजेसा रंग, कला, ताल आणि जनसंवाद यांचा सुरेल संगम साधत पिंपरी चिंचवड महापालिकेच्या पुढाकारातून चिंचवड येथील एल्प्रो मॉलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या मतदान जनजागृती कार्यक्रमाने नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. मतदानाचे महत्त्व प्रभावीपणे मांडणारा हा उपक्रम स्वीप अंतर्गत उत्साहात पार पडला.

पिंपरी चिंचवड महापालिकेची सार्वत्रिक निवडणूक राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केली असून, या निवडणुकीसाठी १५ जानेवारी २०२६ रोजी प्रत्यक्ष मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर मतदारांमध्ये मतदानाबाबत जागृती निर्माण करण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेमार्फत महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली व अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या अधिपत्याखाली महापालिका हद्दीत स्वीप कार्यक्रमांतर्गत व्यापक मतदान जनजागृती मोहीम सुरू आहे.




या अंतर्गत चिंचवड येथील एल्प्रो मॉलमध्ये मतदान जनजागृती कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी नागरिकांचे लक्ष वेधून घेणारा फ्लॅश मॉब तसेच मतदानाबाबत जनजागृती करणारे प्रभावी पथनाट्य सादर करण्यात आले. या सादरीकरणांच्या माध्यमातून नागरिकांमध्ये मतदानाबाबत सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करून त्यांना मतदानासाठी प्रवृत्त करण्यात आले. मॉलमध्ये खरेदीसाठी आलेल्या नागरिकांनी, युवकांनी व कुटुंबांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, उपायुक्त अण्णा बोदडे यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमाला एल्प्रो मॉलचे केंद्र संचालक निशांत कन्सल यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

### मतदानाची शपथ

» आम्ही, भारताचे नागरिक, लोकशाहीवर निष्ठा ठेवून याद्वारे प्रतिज्ञा करतो की, आपल्या देशाच्या लोकशाही परंपरांचे जतन करू आणि मुक्त, निःपक्षपाती व शांततापूर्ण वातावरणातील निवडणुकांचे पावित्र्य राखू व प्रत्येक निवडणुकीत निर्भयपणे तसेच धर्म, वंश, जात, समाज, भाषा यांच्या विचारांच्या प्रभावाखाली न येता किंवा कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करू, अशी शपथ यावेळी उपस्थितांना देण्यात आली.

" मतदान प्रक्रियेत नागरिकांचा थेट सहभाग वाढवण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिका स्वीप अंतर्गत विविध उपक्रम राबवत आहे. मॉल तसेच शहरातील सार्वजनिक ठिकाणी मतदान जनजागृती उपक्रम आयोजित करण्यास भर दिला जात असून मतदानाबाबत सकारात्मक वातावरण निर्माण करण्यासाठी ते उपयुक्त ठरत आहेत.

- तृप्ती सांडभोर, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.

" लोकशाहीची खरी ताकद नागरिकांच्या जागरूक सहभागातून उभी राहते. कला, संवाद आणि प्रत्यक्ष अनुभवाच्या माध्यमातून दिलेला मतदानाचा संदेश अधिक परिणामकारक ठरतो आणि नागरिकांना मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रापर्यंत जाण्यास प्रेरित करतो. त्यासाठी पिंपरी चिंचवड शहरातील जास्तीतजास्त नागरिकांमध्ये मतदानाबाबत जनजागृती करण्यासाठी आम्ही विविध उपक्रम राबवत आहोत.

- अण्णा बोदडे, उपायुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.

# निवडणूक प्रक्रियेच्या प्रत्येक टप्प्यावर सतर्कता आवश्यक; अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे

## मतदान प्रक्रिया पारदर्शक ठेवण्यासाठी कायदे व ईव्हीएम हाताळणीचे सविस्तर प्रशिक्षण

**पिंपरी | प्रतिनिधी**

लोकशाही प्रक्रियेत मतदान हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड महापालिका प्रशासनावर नागरिकांचा विश्वास अबाधित ठेवणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. यासाठी निवडणूक काळात केवळ मतदानाच्या दिवशी पुरते आपले कार्य मर्यादित नसून, संपूर्ण निवडणूक प्रक्रियेच्या प्रत्येक टप्प्यावर दक्ष राहणे आवश्यक आहे. या प्रशिक्षणात सर्व शंकांचे निरसन करून, आत्मविश्वासाने निवडणूक कामकाज पार पाडा, असे प्रतिपादन अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांनी केले.

तीन सत्रात पार पडलेल्या या प्रशिक्षणामध्ये प्रथम सत्रात चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात संगणकीय सादरीकरणाद्वारे मतदान प्रक्रियेचे सविस्तर प्रशिक्षण अधिकारी, कर्मचाऱ्यांना देण्यात आले. तर द्वितीय सत्रात प्रात्यक्षिकाद्वारे ईव्हीएम हाताळणीचे प्रशिक्षणही अधिकारी, कर्मचाऱ्यांना देण्यात आले. या प्रशिक्षणास अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, सह आयुक्त मनोज लोणकर, उपायुक्त पंकज पाटील, विशेष अधिकारी किरण गायकवाड, मुख्य प्रशिक्षक सतीश मेहेर, अविनाश वाळुंज, रामेश्वर पवार, नरेंद्र बंड यांच्यासह संबंधित समन्वय अधिकारी तसेच मतदान प्रक्रियेसाठी नियुक्त मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना सह आयुक्त मनोज लोणकर म्हणाले, निवडणूक कामकाजात पारदर्शकता व शिस्त अत्यंत महत्त्वाची आहे. मतदान केंद्रावर मतदार ओळख प्रक्रिया,



गोपनीयतेची अंमलबजावणी व आचारसंहितेचे पालन याबाबत तसेच मतदानाच्या दिवशी उद्भवणाऱ्या तांत्रिक अडचणी व त्यावरील उपाययोजनांची सविस्तर माहिती सर्वांनी करून घ्यावी. तसेच मतदानानंतरची कागदपत्रे, अहवाल सादरीकरण व वरिष्ठ अधिकाऱ्यांशी समन्वय कसा ठेवावा यावरही भर देऊन सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांनी जबाबदारीने व दक्षतेने काम करून निवडणूक प्रक्रिया यशस्वी करावी, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

उप आयुक्त पंकज पाटील म्हणाले, पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक ही लोकशाहीची अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया असून ती यशस्वी करण्याची जबाबदारी आपल्या सर्वांच्या खांद्यावर आहे. मतदान केंद्रावर होणारी प्रत्येक कृतीची नियमानुसार नोंद होणे आवश्यक आहे. शिस्त, शांतता आणि निष्पक्षता या निवडणूक प्रक्रियेच्या मूलभूत बाबी असून त्यांचे काटेकोर पालन होणे गरजेचे आहे. कोणतीही चूक किंवा निष्काळजीपणा टाळून प्रत्येक टप्प्यावर दक्षतेने काम केल्यास व निवडणूक कायदे आणि मार्गदर्शक सूचनांची अचूक अंमलबजावणी केल्यास नागरिकांचा प्रशासनावरील विश्वास अधिक दृढ होईल.

### ईव्हीएम मशीनचे मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकाऱ्यांना प्रात्यक्षिक..

» पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक ईव्हीएम मशीनद्वारे घेण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर प्रशिक्षणाच्या दुसऱ्या सत्रात निवडणूक प्रक्रियेत वापरण्यात येणाऱ्या ईव्हीएम यंत्रांची रचना, कंट्रोल युनिट व बॅलेट युनिटची कार्यपद्धती याबाबत मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे सविस्तर माहिती देण्यात आली. मतदान सुरू होण्यापूर्वी मॉक पोल घेण्याची अचूक प्रक्रिया, मतदानादरम्यान उद्भवणाऱ्या तांत्रिक अडचणींवर तत्काळ उपाययोजना तसेच मतदान संपल्यानंतर ईव्हीएम यंत्रे सुरक्षितरीत्या सील करून सुपूर्द करण्याच्या प्रक्रियेबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या ईव्हीएम प्रात्यक्षिक सत्रासाठी आयटीआयचे जितेंद्र काथवटे, अरुण बांबळे, प्रवीण कोळेकर, योगेश गरड, किशोर शिंदे, संजीव आनंदकर, गणेश सुर्वे, शिवदास वाघमारे, जयवंत अनपट आणि अमोल शिंदे यांनी प्रत्यक्ष मार्गदर्शन केले.

# पुणे महापालिकेत तिरंगी की चौरंगी लढत?

## महाविकास आघाडीतून अजित पवार गट वगळण्याचे संकेत; भाजप-महायुतीसमोर नवी आव्हाने

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महापालिका निवडणुकीसाठी भाजपचा वारू रोखण्यासासाठी महाविकास आघाडीसह अजित पवार गटाच्या बैठका सुरू आहे. या बैठका सुरू असताना मुंबईतील कॉंग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांनी महाविकास आघाडीत राष्ट्रवादी अजित पवार गटाला बरोबर घेण्यास विरोध केला आहे. त्यामुळे आता अजित पवार गट वगळून समविचारी पक्षांना बरोबर घेत महाविकास आघाडी होण्याच्या शक्यता वर्तविली जात आहे. त्यामुळे अजित पवार गटाच्या अडचणी वाढण्याची चिन्हे असताना महापालिकेच्या रणधुमाळीत तिरंगी किंवा चौरंगी लढत होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

महापालिका निवडणूक जाहीर झाल्याने आता प्रत्येक पक्ष तयारीला लागला आहे. या निवडणुकीत भाजपमध्ये जोरदार इनकमिंग सुरू आहे. भाजपने तब्बल 125 जागा निवडून आणण्याची तयारी केली आहे. भाजपच्या कोअर कमिटीची बैठक मुंबईत सुरू आहे. त्यात पुण्यात दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याची चर्चा आहे. याबाबतही बैठका सुरू आहेत. महायुतीत भाजप, शिंदे शिवसेना व आरपीआय एकत्र लढणार आहे. तर मविआत दोन्ही राष्ट्रवादी, शिवसेना, मनसे व कॉंग्रेस एकत्र लढण्याच्या चर्चा सुरू होत्या. राष्ट्रवादीचे दोन्ही गट एकत्र येत मनसेलाही सोबत घेत महाविकास आघाडीच्या हालचाली सुरू झाल्या होत्या. याबाबत बुधवारी पुण्यतील एका हॉटेलमध्ये बैठक झाली. भाजपच्या विरोधात प्रत्येक जागेला एक उमेदवार दिला जाणार तसेच जागा वाटपाच्या प्रस्तावावरही या बैठकीत चर्चा सुरू होत्या. मात्र, मुंबईत प्रदेश कॉंग्रेसच्या बैठकीत अजित पवार गटाबरोबर महाविकास आघाडी न करण्याचे व समविचारी पक्षांना सोबत घेऊन निवडणुकांना सामोरे जाण्याचे आदेश प्रदेश कॉंग्रेसने दिले आहेत. त्यानंतर मविआतून आता अजित पवार गटाचा पत्ता कट झाला आहे. त्यामुळे पुण्यात महायुती, दोन्ही राष्ट्रवादी कॉंग्रेस व महाविकास आघाडी अशी तिरंगी लढत होण्याची शक्यता आहे. जर कॉंग्रेसने मनसेसोबत जाण्यास नकार दिला तर चौरंगी लढत देखील होण्याची शक्यता आहे. या चौरंगी अथवा तिरंगी लढतीत देखील महायुती विरुद्ध राष्ट्रवादी कॉंग्रेस व महाविकास आघाडी अशीच लढत होण्याची शक्यता आहे.

2017 च्या निवडणुकीत राष्ट्रवादी व शिवसेना पक्षात फुट पडली नव्हती. भाजपने या निवडणुकीत 98 जागा जिंकल्या होत्या तर पोट निवडणुकीत एक जागा जिंकली होती. त्यामुळे त्यांच्या नगरसेवकांचा आकडा हा 99 झाला होता. तर राष्ट्रवादी कॉंग्रेसचे 41 उमेदवार निवडून आले होते. राष्ट्रवादीने देखील पोटनिवडणुकीत एक जागा जिंकली होती.




### दोन्ही राष्ट्रवादीला स्वतंत्र लढावे लागणार

» या निवडणुकीत भाजपने महायुतीतून राष्ट्रवादी अजित पवार गटाला प्रमुख विरोधक मानले आहे. त्यामुळे आता अजित पवार व शरद पवार गट एकत्र येण्याची दाट शक्यता आहे. मात्र, महाविकास आघाडीत अजित पवार गटासोबत लढण्यास कॉंग्रेसने नकार दिल्याने आता दोन्ही राष्ट्रवादीला स्वतंत्र लढावे लागणार आहे. त्यामुळे महायुती, दोन्ही राष्ट्रवादी व महाविकास आघाडी अशी तिरंगी लढत होण्याची शक्यता सध्या तरी वर्तवली जात आहे. जर यातही फुट पडली तर चौरंगी लढत होण्याची देखील शक्यता आहे.

> पक्षश्रेष्ठींचा निरोप आला आहे, पुण्यात अजित पवार यांच्या राष्ट्रवादीशी युती करू नका. शिवसेना (उबाठा) आणि इतर कोणी येत असेल तर चर्चा करा. मात्र अजित पवारांशी युती करू नका. त्यामुळे समविचारी पक्षांना सोबत घेऊन पुणे महापालिकेची निवडणूक लढवणार आहोत.
>
> - अरविंद शिंदे, शहराध्यक्ष, कॉंग्रेस

> कॉंग्रेसने निर्णय जाहीर केला आहे. त्यामुळे आता निवडणूक स्वबळावर लढायची की महाविकास आघाडीतून यावर चर्चा करण्यासाठी पक्षाची बैठक शुक्रवार, 26 डिसेंबरला होईल. या बैठकीत पदाधिकाऱ्यांसह इच्छुकांचेही म्हणने ऐकून घेतले जाईल. त्यानंतर निर्णय घेतला जाईल.
>
> - अंकुश काकडे, प्रवक्ते, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्ष


# पाईपलाईन की बोगदा? मुळशीचे पाणी पुण्यात कसे येणार? जलसंपदा विभागासमोर दोन पर्याय

## टाटा धरणातून पुणे शहराला पाणी मिळण्याचा मार्ग मोकळा; शासन सकारात्मक, कालबद्ध कार्यक्रम आखण्याचे आदेश.

**पुणे | प्रतिनिधी**

मुळशी धरणातून सात टीएमसी पाणी शहराला देण्याचा प्रस्ताव अंतिम मान्येतच्या प्रतिक्षेत असताना हे पाणी पुण्यापर्यंत कसे आणता येईल, यावरही जलसंपदा विभागाकडून विचार सुरू आहे. मुळशी धरणाचे पाणी पुणे शहरापर्यंत आणण्यासाठी दोन पर्याय पुढे आले आहेत, त्यापैकी एक पर्याय म्हणजे पाइपलाइनद्वारे पाणी आणणे तर दुसरा पर्याय मुळशी ते खडकवासला धरणापर्यंत ३० किलोमीटर लांबीच्या बोगद्वारे पाणी आणणे.

या दोनपैकी एक पर्यायाची व्यावहारिकता तपासूनच पुढे पाऊले टाकण्यात येणार आहे.



वाढते पुणे शहर, शहरालगतच्या गावांमध्ये वेगाने होणारे नागरीकरण यामुळे पिण्याच्या पाण्याची मागणी वाढलेली आहे. सद्यःस्थितीत पुणे शहराला खडकवासला प्रकल्प, म्हणजे खडकवासला, पानशेत, वरसगाव आणि टेमघर या चार धरणांतून पाणीपुरवठा करण्यात येतो.

तसेच, खडकवासला धरणातून दौंड, इंदापूर आणि हवेली तालुक्यांमधील शेतीसाठी कालव्यातून पाणी सोडण्यात येते. मागील काही वर्षांपासून भामा आसखेड धरणातून पुणे शहराला पाणीपुरवठा करण्यात येतोय. मात्र, वाढत्या नागरीकरणामुळे पिण्याच्या पाण्याची मागणी सातत्याने वाढत चालली आहे. त्यामुळे पुढील 20 वर्षांचा विचार करून मुळशी धरणातून पाणी उपलब्ध करून देण्याच्या मागणीवर गांभीर्याने विचार सुरू आहे.

मुळशी धरणातून पुणे शहरासह मुळशी तालुक्यातील गावांसाठी पाणी मिळावे, अशी मागणी मागील अनेक वर्षांपासून सातत्याने होत आहे. मात्र, मुळशी धरण हे टाटा कंपनीच्या मालकीचे असल्याने या धरणातून पाणी मिळण्यास अडचणी येत आहेत. आता मुळशी धरणातून पाणी मिळण्याबाबत शासनही सकारात्मक आहे. त्यासाठी बैठकाही झाल्या आहेत.

त्यामध्ये मुळशी धरणातून पाणी घेण्यास येत असलेल्या अडचणी, त्यावर काय उपाययोजना करता येतील, आदी बाबींवर चर्चा झाली. या प्रकल्पासाठी कालबद्ध कार्यक्रम आखला जात आहे.

### या प्रकल्पाचे होणारे फायदे

- » उन्हाळ्यात होणारी पाणी कपात थांबण्यास मदत होईल.
- » समाविष्ट गावे, शहरा लगतची गावे आणि वाढत्या उपनगरांना पुरेसे पाणी मिळेल.
- » खडकवासला प्रकल्पावरील ताण कमी होऊन पाण्याचा पर्यायी स्रोत उपलब्ध होईल.

# बिबट्याच्या धुमाकूळानंतर आता चोरट्यांचा सुळसुळाट; नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

## शिरूरच्या बेट भागात बिबट्याने धुमाकूळ घातल्यानंतर भीतीच्या सावटाखाली असलेल्या नागरिकांच्या जीवाला चोरीच्या घटनांनी घोर लावला आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

शिरूरच्या बेट भागात बिबट्याने धुमाकूळ घातल्यानंतर भीतीच्या सावटाखाली असलेल्या नागरिकांच्या जीवाला चोरीच्या घटनांनी पुन्हा एकदा घोर लावला आहे. पिंपरखेड (ता. शिरूर) येथे चार ते पाच जणांच्या टोळक्याने गावठाण आणि बोंबेमळा वस्तीवर धुमाकूळ घालून चोरीचे प्रयत्न केले. मात्र नागरिकांच्या प्रसंगावधान व सतर्कतमुळे या चोरीच्या घटना टळली. या घटनेची माहिती मिळताच शिरूरचे पोलीस उपनिरीक्षक दिलीप पवार, सहायक फौजदार चव्हाण यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, गुरुवारी (दि.२५) रोजी पहाटे अडीच ते साडेतीन वाजेच्या सुमारास पिंपरखेड गावठाणातील रूपचंद भगवानदास गांधी यांचे दुकानाचे शटर तोडून दुकानाच्या गल्ल्यात असलेली चिल्लर रक्कम चोरून नेली.

तर त्याच शेजारील असलेल्या प्रवीण गांधी यांच्या बंद दुकानाचे शटर उघडण्यात आले, त्यानंतर शेतकरी बबन तसेच सुभाष नवगिरे यांचे घराचे कडी कोयंडे तोडण्याचा चोरट्याने प्रयत्न केला. यावेळी जाग आलेल्या गाव शेती कुटुंबियांनी आवाज दिल्यानंतर चोरट्यांनी तिथून पलायन केले.

नंतर त्यांनी एक किलोमीटर अंतरावर असलेल्या बोंबेमळा येथील मारुती भाऊसाहेब बोंबे यांच्या बंगल्याचा दरवाजाचे लॉक तोडून घरात प्रवेश केला. यावेळी तीन ते चार जण आपल्या हातात लोखंडी रॉड व सत्तूर सदृश्य हत्यार असल्याचे बोंबे कुटुंबियांनी सांगितले. मात्र तेथूनही चोरांनी देवगाव (ता. आंबेगाव) रस्त्याच्या बाजूने उसाच्या शेतामधून पलायन केले.

दरम्यान, या चोरीच्या घटनांमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या चोरट्यांचा पोलीस प्रशासनाने बंदोबस्त करून त्यांना जेरबंद करण्याची मागणी परिसरातील ग्रामस्थांनी केली आहे.

बिबट्याने धुमाकूळ घातल्यानंतर भीतीच्या सावटाखाली असलेल्या नागरिकांच्या जीवाला चोरीच्या घटनांनी पुन्हा एकदा घोर लावला आहे. पिंपरखेड (ता. शिरूर) येथे चार ते पाच जणांच्या टोळक्याने गावठाण आणि बोंबेमळा वस्तीवर धुमाकूळ घालून चोरीचे प्रयत्न केले. मात्र नागरिकांच्या प्रसंगावधान व सतर्कतमुळे या चोरीच्या घटना टळली.



### चोरट्यांचे उसाच्या शेतामधून पलायन

» त्यांनी एक किलोमीटर अंतरावर असलेल्या बोंबेमळा येथील मारुती भाऊसाहेब बोंबे यांच्या बंगल्याचा दरवाजाचे लॉक तोडून घरात प्रवेश केला. यावेळी तीन ते चार जण आपल्या हातात लोखंडी रॉड व सत्तूर सदृश्य हत्यार असल्याचे बोंबे कुटुंबियांनी सांगितले. मात्र तेथूनही चोरांनी देवगाव (ता. आंबेगाव) रस्त्याच्या बाजूने उसाच्या शेतामधून पलायन केले.

> 'अशा प्रकारच्या घटना होत असताना नागरिकांनी रात्रीच्या वेळी सावधानता बाळगणे गरजेचे असून सोन्याच्या मौल्यवान वस्तू, पैसे, दागिने हे घरात न ठेवता इतरत्र सुरक्षित ठिकाणी ठेवावेत. त्याचबरोबर अनोळखी किंवा संशयास्पद इसम आपल्या परिसरात आढळल्यास त्याबाबतची गोपनीय माहिती गावातील पोलीस पाटील, तंटामुक्ती अध्यक्ष किंवा पोलीस प्रशासनाला द्यावी. तसेच या भागात झालेल्या चोरीच्या घटनेचा माग काढून लवकरच छडा लावण्यात येईल.'
>
> **- दिलीप पवार, पोलीस उपनिरीक्षक, शिरूर**

> "गेली पन्नास वर्षात या वस्तीवर अशा प्रकारे झालेली घटना आठवत नसून रात्री घडलेल्या घटनेमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे मात्र या घटनांचे गांभीर्य लक्षात घेता पोलीस प्रशासनाने रात्रीच्या वेळी जास्त वाढविणे गरजेचे असून यासाठी ग्रामसुरक्षा दलातील जवानांची मदत घ्यावी तसेच एकाच मार्गाने गस्त न घालता वाड्या वस्तूंवर देखील पोलीस प्रशासनाने गस्त घालावी.'
>
> **- पांडुरंग बोंबे, माजी सैनिक**

# दोनदा दुरुस्ती करूनदेखील रस्ता उखडला; नागरिकांनी व्यक्त केला तीव्र संताप

## लाखो रुपये खर्च करून करण्यात आलेली ही दुरुस्ती दर्जाहीन असल्याचा आरोप होत असून, संबंधित विभागाच्या कामकाजावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले

**पुणे | प्रतिनिधी**

शिरूर तालुक्यातील शिरूर–मलठण रस्त्यावरील कोंढण ओढा परिसरात सार्वजनिक बांधकाम विभागाने दोन वेळा खड्डे भरून दुरुस्ती केल्यानंतरही काही दिवसांतच तोच रस्ता पुन्हा उखडल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. लाखो रुपये खर्च करून करण्यात आलेली ही दुरुस्ती दर्जाहीन असल्याचा आरोप होत असून, संबंधित विभागाच्या कामकाजावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

या रस्त्यावरून दररोज शेकडो वाहनांची वर्दळ असते. शाळकरी विद्यार्थी, कामगार, शेतकरी तसेच रुग्णवाहिका यांनाही याच मार्गाचा वापर करावा लागतो. मात्र रस्त्यावर पुन्हा मोठे खड्डे पडून खडी वर आल्याने खडीवरून दूचाकी वाहन घसरून अपघात होत आहे. तसेच फोर व्हीलर गाड्यांचे टायर या ठिकाणी फुटत आहे. अपघाताचा धोका वाढला असून दुचाकीस्वार आणि लहान वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

स्थानिक नागरिक नितीन थोरात यांनी सांगितले की, "एकदा नाही तर दोनदा खड्डे भरले, पण निकृष्ट साहित्य वापरल्यामुळे रस्ता उखडला. सार्वजनिक बांधकाम विभाग जाणीवपूर्वक याकडे काना डोळा करत आहे." त्यामुळे ही दुरुस्ती केवळ कागदावरच झाली की काय, असा संशय नागरिकांकडून व्यक्त होत आहे. दरम्यान, या प्रकरणी संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांची चौकशी करून, शिरूर येथे कामावर असणाऱ्या परंतु पुणे येथे राहणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थ, वाहनचालक आणि प्रवासी संघटनांकडून होत आहे. अन्यथा आंदोलनाचा इशाराही नागरिकांनी दिला आहे.

शिरूर तालुक्यातील शिरूर–मलठण रस्त्यावरील कोंढण ओढा परिसरात सार्वजनिक बांधकाम विभागाने दोन वेळा खड्डे भरून दुरुस्ती केल्यानंतरही काही दिवसांतच तोच रस्ता पुन्हा उखडल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.



### आधिकाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी

» दुरुस्ती केवळ कागदावरच झाली की काय, असा संशय नागरिकांकडून व्यक्त होत आहे. दरम्यान, या प्रकरणी संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांची चौकशी करून, शिरूर येथे कामावर असणाऱ्या परंतु पुणे येथे राहणाऱ्या आधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थ, वाहनचालक आणि प्रवासी संघटनांकडून होत आहे. अन्यथा आंदोलनाचा इशाराही नागरिकांनी दिला आहे.